महाराष्ट्र टाइम्स

# बृहन्महाराष्ट्र मंडळ अधिवेशनाचे हाकारे

26 Jan 2008, 0031 hrs IST

फिलाडेल्फियामध्ये किमान सात हजारांची उपस्थिती

एकाच वेळी सात सभागृहांमध्ये भरगच्च कार्यक्रम

म. टा. सांस्कृतिक प्रतिनिधी

बृहन्महाराष्ट्र मंडळाचे आगामी १४ वे अधिवेशन फिलाडेल्फियात २००९ साली भरणार आहे. परंतु त्याची 'न भूतो' तयारी करण्यासाठी संयोजक मंडळी आतापासूनच कामाला लागली आहे. हे अधिवेशन केवळ अमेरिकेतल्या मराठी माणसांपुरते सीमित नसून भारतातल्या मराठीजनांनीही त्यात मोठ्या प्रमाणावर सहभागी व्हावे आणि दोन भौगोलिक प्रदेशांत राहणाऱ्या पण एकच मूळ असणाऱ्यांचे हे खऱ्या अर्थाने हृदयसंवादी संमेलन व्हावे, म्हणून त्यांनी सर्वांना हाकारे देण्यास सुरुवात झाली आहे.

बृहन्महाराष्ट्र मंडळाच्या या अधिवेशनाचे संयोजक मुकुंद कुटे, सहसंयोजक मंदार जोगळेकर, किरण जोगळेकर, डॉ. अनिल नेरुरकर आणि त्यांचे सहकारी सध्या याच तयारीसाठी भारतात आले आहेत. या द्वैवार्षिक अधिवेशनास आतापर्यंत साधारणत: ३ हजार लोकांची उपस्थिती लाभते. परंतु फिलाडेल्फिया अधिवेशनासाठी अमेरिकेतून ५ हजार आणि भारतातून २ हजार लोक यावेत यासाठी ते प्रयत्नशील आहेत. त्यासाठी मुंबई व पुणे येथे प्रत्येकी एक संपर्क कार्यालय उघडण्यात आले आहे. अधिवेशनात ६०हून अधिक कार्यक्रम होणार असून ५० टक्के कार्यक्रम महाराष्ट्र आणि गोव्यातून निमंत्रित केले जाणार आहेत. मुख्य सभागृहाबरोबरच अन्य सहा सभागृहांमध्ये समांतरपणे २ ते ५ जुलैदरम्यान कार्यक्रम होणार आहेत. यात मराठी नाटकांतले नवे प्रवाह, आजवर प्रकाशात न झालेल्या कलांना प्राधान्य दिले जाणार आहे.

अधिवेशनाची अधिक बीएमएमच्या वेबसाइटवर मिळेल. पुणे कार्यालय : द्वारा : धनंजय दातार, ६, सावली, सहवास सोसायटी, कर्वेनगर, पुणे ५२. दूरध्वनी : ०२०-२५४१०२२६. मुंबई कार्यालय : द्वारा : डॉ. नंदिता आणि प्रदीप पालशेतकर, ५३४ बॉम्बे म्युच्युअल टेरेस, ऑपेरा हाऊस, मुंबई ७. दूरध्वनी : ०२२-२३६९१३८६.